दैनिक
# अदिती एक्सप्रेस

दि. ९ जानेवारी २०२६
शुक्रवार
वर्ष ४ थे
अंक ७३
किंमत २ रूपये
पृष्ठे ४
लातूर
RNINO.MHMAR/25/A1409

संपादक - गंगाधर अभंग डिगोळे  उपसंपादक : डॉ. ज्ञानेश्वर विठ्ठल कल्याणे

ईमेल-aditiexpress33@gmail.com, **Website: www.aditiexpress.in**

**आजचे पंचाग**
- दिनांक : ९ जानेवारी २०२६
- वार : शुक्रवार
- माह (अमावस्यांत) : पौष
- माह (पूर्णिमांत) : माघ
- ऋतु : शिशिर
- आयन : उत्तरायण
- पक्ष : कृष्ण पक्ष
- तिथी : सप्तमी तिथी
- नक्षत्र : उत्तरा फाल्गुनी नक्षत्र (दुपारी ०१:४० पर्यंत) त्यानंतर हस्त नक्षत्र
- योग : शोभन योग (सायंकाळी ०४:५५ पर्यंत) त्यानंतर अतिगण्ड योग
- करण : विस्ती भद्रा करण (रात्री ०७:३९ पर्यंत) त्यानंतर भाव करण
- चंद्र राशी : कन्या राशी
- सूर्य राशी : धनु राशी
- अशुभ मुहूर्त:
- राहु काळ : सकाळी ११:२३ ते दुपारी १२:४६ पर्यंत
- शुभ मुहूर्त:
- अभिजित : दुपारी १२:२४ ते दुपारी ०१:०८
- सूर्योदय : सकाळी ०७:१५
- सूर्यास्त : सायंकाळी ०६:१६
- संवत्सर : विश्वावसु
- संवत्सर(उत्तर) : सिद्धार्थी
- विक्रम संवत: २०८२ विक्रम संवत
- शक संवत: १९४७ शक संवत

## यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प रविवारीच सादर होणार

नवी दिल्ली : अर्थमंत्री निर्मला सीतारामण १ फेब्रुवारी, रविवार रोजी केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ सादर करणार आहेत.



केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखालील संसदीय कामकाज समितीने बुधवारी संसदेच्या आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या प्रमुख तारखांना मान्यता दिली आहे. संसदीय दिनदर्शिकेनुसार, अर्थमंत्री निर्मला सीतारामण १ फेब्रुवारी, रविवार रोजी केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ सादर करतील.

या आधी २८ फेब्रुवारी १९९९ रोजी अर्थमंत्री यशवंत सिन्हा यांनी रविवारी अर्थसंकल्प सादर केला होता. त्या दिवशी अर्थसंकल्पाची वेळ बदलण्यात आली होती. जुनी परंपरा मोडत त्यावेळी अर्थसंकल्प सकाळी ११ वाजता सादर केला गेला होता.

विकसित भारतावर भर

२०२६-२७ चा अर्थसंकल्प महत्त्वपूर्ण मानला जातो. कारण तो जागतिक तणाव आणि डोनाल्ड ट्रम्पच्या टॅरिफच्या भीतीच्या दरम्यान आला आहे. आर्थिक विकासाला परिणामी, **(पान २ वर)**

## अहमदनगर नव्हे अहिल्यानगरचा महापौर; फडणवीसांची तोफ धडाडली

अहिल्यानगर- राज्यात महानगरपालिका निवडणूक लागली आहे. अनेक ठिकाणी विविध युती, आघाडी आपल्याला दिसून येत आहे. निवडणूक जिंकण्यासाठी भाजपने जोरदार तयारी केली आहे. अन्य पक्ष देखील जोरदार प्रचार सुरू करताना दिसून येत आहे. दरम्यान आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अहिल्यानगरमध्ये प्रचारसभा घेतली.

अहिल्यानगरमधील प्रचारसभेत बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, अहिल्यानगरमध्ये महानगरपालिकेच्या प्रचारासाठी मी आलो आहे याचा मला



आनंद आहे. यापूर्वीही निवडणूक झाली होती, मात्र ती अहमदनगर महानगरपालिका निवडणूक होती. मात्र ही पहिली निवडणूक आहे की, ज्या निवडणुकीत निवडून येणारा महापौर हा अहिल्यानगरचा असणार आहे, याचा आनंद आहे.

पुढे बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अहिल्यानगरमध्ये महायुतीचाच महापौर होणार. पंतप्रधान मोदी यांनी शहरांसोबत गावांचा विकास आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. आज मी आपल्या अडचणी समजून घेण्यासाठी आलो आहे. मी यायच्या आधीच तुम्ही महायुतीचे ५ नगरसेवक बिनविरोध निवडून दिले, त्याबद्दल तुमचे आभार व्यक्त करतो. अहिल्यानगची जनता आपल्यालाच निवडून देणार आहे. अहिल्यानगर महानगरपालिकेच्या ४९२ कोटींच्या प्रस्तावाला मान्यता देऊ. **(पान २ वर)**

## आरक्षणाचा लाभ घेतल्यानंतर खुल्या जागेवरचा दावा संपुष्टात

नवी दिल्ली : आरक्षित सीटवर अर्ज केल्यानंतर आणि लाभ घेतल्यानंतर उमेदवार नंतर जनरल सीटवर दावा करू शकत नाही. जरी त्या उमेदवाराचे मार्क हे जनरल श्रेणीतील विद्यार्थ्यांच्या बरोबरीचे असले तरी त्या विद्यार्थ्याला आपण सीटवर दावा करता येणार नाही. सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाच्या पात्रतेबाबत बुधवारी निर्णय दिला आहे.



देशात मागास आणि अनुसूचित जातींसाठी तयार करण्यात आलेल्या आरक्षण धोरण आणि स्पर्धात्मक परीक्षांसाठी मिळणाऱ्या सवलतींबाबत न्यायालयाने हा निर्णय दिला. जो विद्यार्थी आरक्षित श्रेणीमधून सुरुवातीच्या परीक्षा, प्रिलिम्समध्ये आरक्षण नियमानुसार मिळणाऱ्या सवलतींचा लाभ घेतो त्याला याच आरक्षित श्रेणी अंतर्गत पुढे देखील राहावे लागणार आहे. जर या उमेदवाराने अंतिम परीक्षेत चांगले मार्क मिळवले. त्या आधारे तो ओपन सीटवर दावा करू शकत नाही. त्याला सुरुवातीच्या परीक्षा ज्या आरक्षित श्रेणीतून दिल्या होत्या, त्याच श्रेणीत रहावे लागणार आहे. **(पान २ वर)**

## ११ वर्षांच्या भावाने बिबट्याच्या तावडीतून वाचवला बहिणीचा जीव

सांगली : सध्या महाराष्ट्रात बिबट्यांचा सुळसुळाट झाला आहे. अनेकांनी आपले जीव गमावले आहेत. अनेक आई बाबानी आपली चिमुकली मुले आणि कुटुंबीयांनी म्हातारी माणसे गमावली आहेत. त्यामुळे गावांमध्ये बिबट्यांविषयी भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



अशीच काहीशी घटना सांगली जिल्ह्यातील उपवळे गावात बुधवारी ७ जानेवारी रोजी रात्री घडली. घराबाहेर दबा धरून बसलेल्या बिबट्याने ९ वर्षीय चिमुकलीवर झडप घालत तिला ओढून नेण्याचा प्रयत्न केला. मात्र, स्वतःच्या जीवाची पर्वा न करता प्रसंगावधान राखून तिच्या ११ वर्षांच्या भावाने धाडस दाखवत बहिणीचा जीव वाचवला. या प्रसंगामुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून, मुलाच्या धैर्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

नेमकं काय घडलं?

उपवळे गावातील हनुमान मंदिराजवळ संग्राम पाटील यांचे घर आहे. बुधवारी रात्री जेवण झाल्यानंतर शिवम आणि स्वरांजली पाटील हे भाऊ-बहीण एका घरातून दुसऱ्या घराकडे जात होते. त्याच वेळी घरांच्या मधील मोकळ्या जागेत दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक स्वरांजलीवर हल्ला चढवत तिची मान पकडली. **(पान २ वर)**

बुलढाणा : राज्यातील गोरगरीब महिलांना आर्थिक पाठबळ मिळाव यासाठी सरकारने लाडकी बहीण योजना लागू केली. या योजनेचा असंख्य बहिणींनी लाभही घेतला आणि सरकारला अनेक शुभाशीर्वादही दिले.

या योजनेचा लाभ फक्त आर्थिक दृष्ट्या कमकुवत महिलांनी घ्यावा असे सरकारचे धोरण होते, परंतु काही ठिकाणी प्रचंड पैसे असलेल्या, अगदी आर्थिक स्थिती उत्तम असलेल्या महिलांनीही पैसे फुकट पैसे मिळत आहेत. म्हणून या योजनेचा लाभ घेतला आणि यामुळे राजुत सर्वत्र खळबळ माजली.

ही बाब सरकारच्या लक्षात येताच अर्ज मागे घेण्यासाठी

## बुलढाण्यात लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांना झटका; सरकारची कडक कारवाई

अनेक आवाहने ही करण्यात आली मात्र कोणीही अर्ज मागे घेतला नाही. शेवटी सरकाराने कठोर कारवाई करत संबंधित महिलांकडून रक्कम वसुली करत कायदेशीर कारवाई हि केली आहे.

बुलढाणा जिल्ह्यात लाडकी बहीण योजनेत गैरप्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी शासनाकडून महिला व बालकल्याण विभागाला विविध विभागांत कार्यरत असलेल्या १९६ कर्मचाऱ्यांची यादी प्राप्त झाली होती. या सर्व




कर्मचाऱ्यांच्या पात्रतेची सखोल चौकशी करण्यात आली.

चौकशीत १९० कर्मचारी अर्धवेळ स्वरूपात कार्यरत असून त्यांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा कमी असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे हे कर्मचारी योजनेसाठी पात्र ठरले. मात्र उर्वरित ६ शासकीय कर्मचारी अपात्र असतानाही त्यांनी योजनेचा लाभ घेतल्याचे आढळून आले.

या सहा कर्मचाऱ्यांकडून प्रत्येकी १६ हजार ५०० रुपये याप्रमाणे एकूण ९९ हजार रुपयांची रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच संबंधित कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगात्मक कारवाई करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या **(पान २ वर)**

## पुणेकरांचा बोपदेव घाट वाहतुकीसाठी ७ दिवस बंद

पुणे : पुण्यातील वाहतुकीत सध्या मोठा बदल करण्यात आला आहे. याच कारण म्हणजे पुण्यातील पुणे - सासवड ला जोडणारा बोपदेव घाट पुढील काही दिवसांसाठी बंद करण्यात आला आहे. त्यामुळे प्रवासासाठी पुणेकरांची प्रचंड धांदल उडणार आहे. बोपदेव हा घाट फक्त सासवड - कोंढवा या ठिकाणच्या प्रवाश्यांसाठीच नाही तर पुरंदरसह अनेक तालुक्यांसाठी महत्वाचा दुवा आहे. बोपदेव घाट हा आजपासून ते पुढील ७ दिवसांपर्यत बंद करण्यात आला आहे. त्यामुळे घाटातून नेहमी प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांसाठी ही बातमी महत्वाची आहे.


बोपदेव घाट बंद करण्याचं कारण म्हणजे बोपदेव घाटात सुरु असलेल्या रस्त्याच्या दुरुस्तीचं आणि विस्तारीकरणाच्या कामामुळे हा मार्ग आजपासून बुधवार पर्यंत म्हणजेच १४ जानेवारी पर्यंत बंद करण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग प्रशासनाने हे काम हाती घेतले असून कामाचा दर्जा आणि सुरक्षितता राखण्यासाठी घाट बंद ठेवण्यात येणार आहे.

पर्यायी मार्ग

घाट बंद ठेवण्यात येणार असलयाने प्रवाश्यांनी दिवे घाट, नारायणपूर मार्गे चिव्हेवाडी **(पान २ वर)**

## शिर्डीला साई बाबांच दर्शन घेतल अन् घरी परताना रस्त्यामध्येच चौघे जागेवरच ठार

नाशिक: नाशिक जिल्ह्यातील आंबेगन शिवाराजवळ राष्ट्रीय महामार्गावर शुक्रवारी सकाळी दोन वाहनांची समोरासमोर भीषण धडक झाली. या अपघातात चार प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला, तर सहा ते सात प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत.अशी माहिती पोलीसांकडुन समोर आली आहे. अपघातात नाशिकहून पेठकडे जात असलेली कार आणि विरुद्ध दिशेने येणारी दुसरी कार धडकली. धडक इतकी जोराची होती की दोन्ही वाहनांचे अवशेष चक्काचूर झाले. मृतदेह शवविच्छेदनासाठी दिंडोरी ग्रामीण रुग्णालयात घेऊन जाण्यात आले आहेत.



जखमींवर नाशिक जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. जखमींमध्ये चार महिलांची प्रकृती गंभीर असल्याचे डॉक्टर्सनी सांगितले आहे. माहिती नुसार, प्रवासी शिर्डी येथे साईंचे दर्शन घेऊन नाशिकमार्गे गुजरातमधील वापीकडे जात असताना चाचडगाव टोलनाका पार केल्यानंतर अपघात झाला. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून स्थानिक नागरिकांनी हळहळ व्यक्त केली आहे.हे अपघात दोन दिवसांपूर्वी घडलेल्या भीषण अपघातासारखेच आहे. राहुरी ते शनिशिंगणापूर रस्त्यावर उंबरे गावाजवळ रिक्षा आणि मिनीबसची समोरासमोर धडक झाली होती, ज्यात इगतपुरीजवळील गिरणारे येथील तीन तरुणांचा **(पान २ वर)**

## पीएचडीची नोंदणी रद्द केलेले ५५३ विद्यार्थी आक्रमक

मुंबई : मुंबई विद्यापीठाने पीएचडी करणाऱ्या तब्बल ५५३ विद्यार्थ्यांची नोंदणी रद्द केली असून याविरोधात विद्यार्थ्यांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे. संशोधनाच्या दृष्टीने आवश्यक वातावरण, पुरेसे प्राध्यापक व मार्गदर्शक, प्रशासकीय व्यवस्था यांचा अभाव, तसेच संशोधनासाठी आवश्यक व पुरेसा डाटा उपलब्ध करण्याकडे मुंबई विद्यापीठ अपयशी ठरले आहे. मात्र याचे खापर विद्यार्थ्यांवर फोडून विद्यापीठाने आपले अपयश लपविण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप विद्यार्थ्यांकडून करण्यात येत आहे.




पीएचडी हा दीर्घकालीन व बहुआयामी प्रवास आहे. त्यात विद्यार्थ्याला मार्गदर्शक, प्रयोगशाळा, संसाधने, विभागीय पातळीवरील प्रगती अहवाल, मंजुरी प्रक्रिया, निधी इत्यादी अनेक घटकांचा आधार आवश्यक असतो. मात्र मुंबई विद्यापीठ पीएचडी करणाऱ्या विद्यार्थ्यांना या सुविधा पुरविण्यात अपयशी ठरले आहे. मार्गदर्शकांची संख्या अपुरी असल्याने पीएचडी करणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना योग्य वेळी मार्गदर्शक मिळाले नाहीत. त्यामुळे संशोधन विषय महिनामहिने प्रलंबित राहिला. काहींच्या प्रगती अहवालांना प्रशासकीय यंत्रणेकडून उत्तरही दिले नाही. त्यामुळे या विद्यार्थ्यांची पीएचडी ८ ते १० वर्षे रखडली. कोरोनामध्ये बहुतांश संशोधन थांबले होते. विद्यापीठाकडून योग्य वेळी प्रोत्साहन, मार्गदर्शन आणि संसाधने मिळाली नाहीत.

मागील ८ ते १० वर्षांत संशोधनाची स्थिती, विभागांनी केलेले मार्गदर्शन, तसेच विद्यापीठाने किती वेळा प्रत्यक्ष प्रगती तपासली याबाबत कधीच आढावा घेण्यात आला नसल्याचे विद्यार्थ्यांकडून सांगण्यात आले. पीएचडी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मानसिक ताण-तणाव, भविष्याची भीती आणि व्यावसायिक अनिश्चितेला सामोरे जावे लागते. मात्र याकडे विद्यापीठाने दुर्लक्ष केल्याबद्दल विद्यार्थ्यांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

## काँग्रेस वंचित बहुजन आघाडीचा 'नव्या लातूरसाठी पाच गॅरंटी' जाहीरनामा उत्साहात प्रकाशित

लातुर प्रतिनिधी: गुरूवार दि. ८ जानेवारी २६- माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी गुरुवार दि.०८ जानेवारी रोजी लातुर शहरातील काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीचे महानगरपालिका निवडणूकितील सर्व उमेदवार,पक्ष निरीक्षक, पदाधिकारी,कार्यकर्ते,सहकार्यास मवेत शहरातील गंजगोलाई इथल्या जगदंबा माता मंदिर या ठिकाणी जाऊन मातेची आरती करून मनोभावे दर्शन घेतले. आणि मातेच्या चरणी लातुर शहर महानगरपालिका निवडणूक २०२५-२६ करीता लातुर वासीयांच्या सूचना मागवून तयार करण्यात आलेला लातूरकरांचा जाहीरनामा अर्पण करून जाहीरनाम्याचे प्रकाशन केले.



यावेळी खासदार डॉक्टर शिवाजी काळगे, माजी आमदार वैजनाथ शिंदे, लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष- अभय साळुंखे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष- ऍड.किरण जाधव,वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा महासचिव-संतोष सूर्यवंशी लातूर महिला जिल्हाध्यक्ष मंजुषा निंबाळकर, माजी महापौर प्रा.स्मिता खानापुरे, माजी महापौर ऍड. दीपक सुळ,लातूर शहराध्यक्ष सचिन गायकवाड, महिला शहराध्यक्ष सुजाता अजनीकर,अमोल लांडगे रोहित सोमवंशी,डॉ. विजय अजनीकर,शिवशंकर आप्पा बिडवे, बसवंतआप्पा भरडे, सूर्यप्रकाश धूत, सर्जेराव मोरे,प्रमोद जाधव,अमर राजपूत आदिसह काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीचे नगरसेवक पदाचे सर्व उमेदवार,विविध पदाधिकारी,

कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर दि. ८ जानेवारी २६ रोजी, काँग्रेस वंचित बहुजन आघाडीचा जाहीरनामा मोठ्या उत्साहात प्रकाशित करण्यात आला. हा जाहीरनामा खासदार डॉ. शिवाजी काळगे यांच्या हस्ते प्रसिद्ध झाला. यावेळी आमदार अमित विलासराव देशमुख, काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच काँग्रेसवंचित बहुजन आघाडीचे सर्व ७० उमेदवार उपस्थित होते. गंजगोलाई येथे एकत्र येऊन जगदंबा मातेचे दर्शन घेतल्यानंतर जाहीरनामा प्रकाशन व पत्रकार परिषद पार पडली. या जाहीरनाम्यात नव्या लातूरच्या प्रगतीसाठी पाच गॅरंटी सह अनेक मूलभूत गरजांकडे लक्ष देण्यात आल्या असून, लातूरकरांच्या दैनंदिन जीवनाशी थेट जोडलेल्या मुद्द्यांवर ठोस व कालबद्ध उपाययोजना मांडण्यात आल्या आहेत.

नव्या लातूरच्या प्रगतीसाठी पाच गॅरंटी पुढीलप्रमाणे

* लातूर केअर : प्रत्येक नागरिकासाठी **(पान २ वर)**

## आमदार अभिमन्यू पवार यांच्या हस्ते ३ कोटींच्या विकासकामांचे लोकार्पण



**दै. अदिती एक्सप्रेस**

औसा - औसा मतदारसंघातील किनीनवरे गावाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण टप्पा ठरत, आमदार अभिमन्यू पवार यांच्या हस्ते जवळपास ३ कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचे लोकार्पण तसेच ७२ लाख रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन उत्साहात पार पडले. या विकासकामांमुळे गावातील पायाभूत सुविधा अधिक भक्कम होणार असून नागरिकांच्या दैनंदिन जीवनात मोठी सोय होणार आहे.

यावेळी आमदार अभिमन्यू पवार यांनी किनीनवरे गावास भेट देऊन किनीनवरे मुख्य रस्ता, केंगलवाडी मुख्य रस्ता, केंगलवाडी येथील स्मशानभूमीचे बांधकाम, समाजमंदिर बांधकाम तसेच जिल्हा परिषद शाळेतील स्वच्छतागृह बांधकाम अशा जवळपास ३ कोटी रुपयांच्या विकासकामांचे लोकार्पण केले. त्याचबरोबर प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या नवीन इमारतीसह सुमारे ७२ लाख रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले.

या प्रसंगी बोलताना आमदार अभिमन्यू पवार म्हणाले की, औसा मतदारसंघाचा अनेक वर्षांचा विकासाचा बॅकलॉग भरून काढण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. पायाभूत सुविधा बळकट करण्यासोबतच शेतकरी हा **(पान २ वर)**

# महाराष्ट्रातही 'पारो'

महाराष्ट्रातल्याच एका कुटुंबाने महाराष्ट्राच्या आदिवासी जमातीतील एक मुलगी विकत घेण्याचा हा प्रकार गंभीर तर आहेच; पण अन्य भागातला हा गैरप्रकार महाराष्ट्रातही फोफावला असल्याचा पुरावा आहे. महाराष्ट्र हे सामाजिक - सांस्कृतिकदृष्ट्या प्रगत राज्य मानलं जात असलं, तरी इथेही स्त्रीभ्रूणहत्येचे प्रकार घडतच नाहीत, असं कोणी म्हणू शकणार नाही.

भारतातली स्त्री मुक्ती चळवळ आपलं सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरा करत असतानाच मुंबईपासून अवघ्या ८० किलोमीटर अंतरावर तीन लाख रुपयांना मुलींची विक्री झाल्याचं प्रकरण काल उघड झालं. भारतात काही भागांत महिलांची खरेदी-विक्री सर्रास होते, ही चर्चा यापूर्वी अनेकदा झाली आहे. पत्रकारांनी सप्रमाण त्याचे पुरावे दिले आहेत. त्यावर आधारित नाटक-सिनेमे गाजले आहेत. अनेक शोधनिबंध प्रसिद्ध झाले आहेत. अनेक संस्थांनी सर्वेक्षणं करून या खरेदी - विक्रीमागच्या सामाजिक कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्नही केला आहे. महिलांची खरेदी-विक्री हा मानवी तस्करीचाच भाग मानून त्याबाबत देशात कडक कायदे आहेत. पण, तरीही अशी खरेदी-विक्री देशाच्या उत्तर भागात व्यवहाराचा नित्याचा भाग मानली जाते. गेल्या काही वर्षांत यात पुन्हा वाढ झाली असून हरियाणा, पंजाब आणि राजस्थान ही तीन राज्य त्यासाठी विशेष बदनाम आहेत. कृषी क्रांतीच्या अग्रणी असलेल्या या तीनही राज्यांत जमीन आणि स्थावर मालमत्तेला मोठी किंमत आणि प्रतिष्ठा असल्याने आजही तिथे मुलगाच जन्माला यावा, अशी धरणा सर्व सधन कुटुंबांत असते. स्त्री भ्रूणहत्येविरोधात कितीही कायदे झाले, प्रबोधनात्मक चळवळी झाल्या तरीही पुरुषसत्ताक समाजाची मनोवस्था अद्याप पूर्णपणे बदललेली नाही. काही अंशी बदल झाला असेलही. पण, त्याने स्त्रीभ्रूणहत्येने निर्माण होणारे प्रश्न संपलेले नाहीत. उत्तरेकडच्या काही राज्यातील ही स्थिती कागदावर आहेच; पण त्याचबरोबर समाजात त्यामुळे निर्माण झालेल्या कुप्रथांची चर्चाही सर्वत्र आहे. 'पारो', 'खरीदी हुयी', 'मोल की बहु' या घरांतील विशेषणांनी समाजात त्यांचा एक वेगळा दर्जाही तयार झाला आहे. सामाजिक स्तरावर अशा 'सुना'साठी ही विशेषणं व्यापकपणे स्वीकारलीही गेली आहेत. अमेरिकेत छुपेपणाने पोहोचण्यासाठी जसा 'डन्की' मार्ग होता, तसाच या खरेदी केलेल्या महिलांना त्यांच्या खरेदीदार घरापर्यंत पोहोचवण्यासाठी वहिवाटीचे मार्गही तयार झाले आहेत. नेपाळबरोबरच देशातील बिहार, आसाम, पश्चिम बंगाल, त्रिपुरा, उत्तराखंड, उत्तर प्रदेश, आंध्र, हिमाचल, झारखंड आणि ओडिशातल्या दुर्गम, ग्रामीण, गरीब कुटुंबातील मुलींची खरेदी करून त्यांना दिल्ली, पालवाल, कर्नाल, काल्का, अंबालातील ठरावीक ठिकाणी आणून नंतर खरेदीदारांच्या भागात पाठवलं जातं, असं यापूर्वी प्रसिद्ध झालं आहे.

उत्तरेतलं हे लोण महाराष्ट्रातही आलं आहे. विशेषतः आदिवासी पट्ट्यात दलालांनी आपलं जाळं विणलं असल्याचं कालच वाडा तालुक्यात दाखल झालेल्या एका पोलीस तक्रारीतून उघड झालं आहे. मूळ तक्रार कौटुंबिक हिंसाचाराची असली, तरी त्या तक्रारीच्या तपशिलात संबंधित महिलेला सिन्नर तालुक्यातील एका कुटुंबाने तीन लाख रुपयांना काही वर्षांपूर्वी खरेदी केलं असल्याचं नमूद करण्यात आलं आहे. खरेदी केलेल्या या कुटुंबाने तिला सून म्हणूनच घरी ठेवलं असलं, तरी 'खरेदी' असल्याने तिच्यावर कामाचा असह्य बोजा होता. तेही ती नीट करत नाही, म्हणून तिला एकदा माहेरीही सोडून देण्यात आलं होतं. पण, नंतर तिला मुलगा झाल्यानंतर पुन्हा माहेरी पाठवून मुलासह खरेदीचे पैसे परत करण्याची मागणी सुरू झाल्याने प्रकरण चिघळलं आणि पोलिसात गेलं. त्यातून हा प्रकार उघड झाला. महाराष्ट्रातल्याच एका कुटुंबाने महाराष्ट्राच्या आदिवासी जमातीतील एक मुलगी विकत घेण्याचा हा प्रकार गंभीर तर आहेच; पण अन्य भागातला हा गैरप्रकार महाराष्ट्रातही फोफावला असल्याचा पुरावाच आहे. महाराष्ट्र हे सामाजिक - सांस्कृतिकदृष्ट्या प्रगत राज्य मानलं जात असलं, तरी इथेही स्त्रीभ्रूणहत्येचे प्रकार घडतच नाहीत, असं कोणी म्हणू शकणार नाही. त्याचं प्रमाण इतर राज्यांपेक्षा कमी असू शकेल. पण, 'वंशाला दिवा हवा' ही भावना इथेही प्रबळ आहेच. आर्थिक ओढगस्तीने एकाच अपत्याचा विचार समाजात रुजला असल्याने 'एकच अपत्य हवं, तर तो मुलगाच हवा' हा आग्रहही बळावला आहे. परिणामी महाराष्ट्रातील लिंग गुणोत्तर प्रमाण पुन्हा ढासळलं असून त्याची निश्चित आकडेवारीही उपलब्ध आहे. मुलांच्या विवाहाची समस्या जटिल झाली आहे. येत्या काही दिवसांत तीच महाराष्ट्रातील सर्वात मोठी सामाजिक समस्या म्हणून सोडावी लागणार आहे! ठाणे जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील गारगावला काल जी घटना उघड झाली, त्यालाही हीच पार्श्वभूमी आहे. या सामाजिक समस्येतूनच महिलांच्या खरेदी - विक्रीला चालना मिळते आहे. विवाह समारंभांचे वाढलेले खर्च, हुंडा, मानपान, विवाहोत्तर राहणीमानाच्या कल्पना यामुळे मुलींच्या गरीब बापांची स्थिती बिकट झाली आहे. अशा परिस्थितीत हा 'उलट हुंडा' ही दोन्ही बाजूंसाठी सोयीचीच बाब ठरते. मुलींच्या गरीब पित्यांना नाईलाजाने स्वीकारावी लागत असलेली ही 'व्यवस्था' सामाजिक कार्यकर्त्यांसाठी मोठं आव्हान आहे. 'लाडकी बहीण'सारख्या योजनेचा अशा समस्यांवर काय उपयोग झाला किंवा होऊ शकतो, याचा सविस्तर अभ्यास व्हायला हवा. समाजातल्या तळागाळातल्या मुली-तरुणी-महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होणं हेच यावरचं एकमेव उत्तर आहे. नियोजनकर्त्यांनी त्यादृष्टीने महिला कल्याणाच्या योजनांचा विचार केला पाहिजे. योजनांची अंमलबजावणी, गरजूंपर्यंत त्या पोहोचवणं हा आणखी वेगळा मुद्दा आहे. त्यासाठी सामाजिक संस्थांची मदत प्रभावी ठरू शकते. ठाणे जिल्ह्यात उघड झालेली ही घटना महाराष्ट्राला लांच्छन आहे, असं समजून तिची तेवढ्याच गांभीर्याने दखल घेण्याची गरज आहे. कोणत्याही घटनेमागील कारणांचा विचार केल्याशिवाय त्या घटनेचं विश्लेषण होऊ शकत नाही. गारगावला झालेल्या महिलेच्या खरेदी-विक्री व्यवहाराला या किंवा अशाच आणखी काही बाजू असू शकतील. त्या समजून घ्याव्याच लागतील. पण, त्याने महाराष्ट्रात महिलेची सहजपणे खरेदी-विक्री झाली, ही वस्तुस्थिती लपत नाही!

# हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर वाढती थंडी : निसर्गाचा बदलता स्वभाव - अशोक गुरनाळे






गेल्या काही वर्षांपासून हवामानाचा स्वभाव सातत्याने बदलताना दिसत आहे. कधी अवकाळी पाऊस, कधी तीव्र उष्णतेची लाट, तर कधी हिवाळ्यात अपेक्षेपेक्षा अधिक कडाक्याची थंडी अशा टोकाच्या परिस्थिती आता अपवाद राहिलेल्या नाहीत, तर त्या नित्याच्याच झाल्या आहेत. सध्या देशातील अनेक भागांमध्ये अनुभवास येणारी तीव्र थंडी ही केवळ हंगामी प्रक्रिया नसून, जागतिक हवामान बदलाचे स्पष्ट संकेत देणारी घटना मानली जात आहे.

थंडीची तीव्रता वाढण्यामागची कारणे

साधारणपणे हिवाळा म्हणजे सौम्य थंडी, गार वारे आणि आल्हाददायक वातावरण अशी प्रतिमा होती. मात्र सध्या चित्र वेगळे दिसते. उत्तर भारतात शीतलहरींची तीव्रता वाढली असून मध्य व काही पश्चिम भारतातही तापमान सरासरीपेक्षा मोठ्या प्रमाणात खाली घसरले आहे. यामागे हिमालयीन प्रदेशातून वाहणारे अतिथंड वारे, पश्चिमी विक्षोभांची वारंवारता आणि जागतिक पातळीवरील हवामान प्रणालींतील बदल कारणीभूत आहेत.

हवामान तज्ज्ञांच्या मते, पृथ्वीचे सरासरी तापमान वाढत असले तरी त्याचे परिणाम सर्वत्र उष्णतेच्या रूपातच दिसतील असे नाहीत. उलट, या तापमानवाढीमुळे वायुप्रवाहांचे संतुलन बिघडते आणि त्यामुळे काही भागांत अत्यंत थंडी, तर काही भागांत तीव्र उष्णता जाणवते. म्हणजेच हवामान बदल हा केवळ उष्णता वाढ एवढ्यापुरता मर्यादित नसून, तो हवामानातील अस्थिरतेचा मोठा प्रश्न आहे.

दैनंदिन जीवनावर होणारा परिणाम

वाढत्या थंडीचा सर्वाधिक परिणाम सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होत आहे. पहाटे आणि रात्रीच्या वेळी तापमान मोठ्या प्रमाणात घटल्याने वृद्ध, लहान मुले आणि आजारी व्यक्तींच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनतो आहे. श्वसनाचे विकार, सर्दी-खोकला, ताप यांसारख्या तक्रारींमध्ये वाढ होताना दिसत आहे.

थंडी आणि दाट धुक्यामुळे वाहतूक व्यवस्थेवरही परिणाम झाला आहे. रस्ते, रेल्वे आणि विमानसेवा वेळापत्रक विस्कळीत होण्याचे प्रकार वाढले आहेत. ग्रामीण भागात पहाटेची शेतीकामे उशिरा सुरू होणे, तर शहरी भागात कामावर जाणाऱ्या नागरिकांना अधिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील परिणाम

थंडीचा थेट परिणाम शेती क्षेत्रावरही होत आहे. काही पिकांना थंडी लाभदायक ठरत असली, तरी अचानक तापमान घटल्यास पिकांचे नुकसान होण्याची शक्यता वाढते. भाजीपाला, फळबागा तसेच पशुधन यांना विशेष काळजी घ्यावी लागत आहे. दंव पडण्याची भीती, पिकांच्या वाढीवर होणारा परिणाम आणि उत्पादन खर्चात होणारी वाढ यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

हवामान बदलाचे दीर्घकालीन परिणाम

आज जाणवणारी तीव्र थंडी ही भविष्यातील मोठ्या संकटाची नांदी असल्याचे तज्ज्ञ सांगतात. जर हवामान बदलाचा वेग असाच कायम राहिला, तर ऋतूंची पारंपरिक रचना पूर्णपणे बदलू शकते. हिवाळा अधिक कडाक्याचा, उन्हाळा अधिक तीव्र आणि पावसाळा अधिक अनिश्चित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याचा परिणाम केवळ पर्यावरणावर नाही, तर अर्थव्यवस्था, आरोग्य व्यवस्था आणि सामाजिक जीवनावरही होणार आहे. त्यामुळे हवामान बदलाकडे केवळ नैसर्गिक घटना म्हणून न पाहता, तो मानवनिर्मित संकट म्हणून गांभीर्याने घेण्याची गरज आहे.

उपाय आणि जबाबदारी

या बदलत्या परिस्थितीत नागरिक, प्रशासन आणि शासन यांची संयुक्त जबाबदारी महत्त्वाची ठरते. एकीकडे तात्काळ उपाययोजना जसे की थंडीपासून संरक्षण, आरोग्यविषयक दक्षता आणि हवामान इशाऱ्यांचे पालन आवश्यक आहेत. तर दुसरीकडे दीर्घकालीन उपाय म्हणून पर्यावरण संरक्षण, प्रदूषण नियंत्रण, वृक्षलागवड आणि शाश्वत विकासाच्या धोरणांवर भर देणे गरजेचे आहे. निष्कर्ष सध्याची वाढती थंडी ही केवळ ऋतू बदलाची प्रक्रिया नसून, हवामान बदलाच्या गंभीर वास्तवाची आठवण करून देणारी घटना आहे. निसर्गाचा हा बदलता स्वभाव मानवाला सावध करत आहे. वेळेत योग्य पावले उचलली नाहीत, तर भविष्यात अशा टोकाच्या हवामान परिस्थिती अधिक तीव्र आणि अधिक वारंवार अनुभवास येतील. त्यामुळे आजची कडाक्याची थंडी ही केवळ थंडी न राहता, उद्याच्या मोठ्या संकटाचा इशारा ठरत आहे.

पान १ वरून

### यंदाचा केंद्रीय ...

पाठिंबा देण्यासाठी आणि जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक म्हणून भारताचा दर्जा राखण्यासाठी सरकारने मोठे आर्थिक सुधारणा उपाय हाती घेण्याची अपेक्षा आहे. सरकारचे विकसित भारत हे ध्येय लक्षात घेऊन अर्थसंकल्प व धोरणांचे विषय निवडण्यात आले आहेत. १ फेब्रुवारीला पेटाऱ्यात काय अहो, ते स्पष्ट होणार आहे.

### अहमदनगर...

अहिल्यानगरमध्ये डीफेन्स कॉरिडॉर तयार करणार. त्यातून रोजगरनिर्मिती देखील होणार आहे. अहिल्यानगरमध्ये दररोज शुद्ध पिण्याचे पाणी आलेच पाहिजे यासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत. शहर उत्तम करत असताना या ठिकामी यांच्या मुलांच्या हाताला काम देखील मिळाले पाहिजे.

धुळे येथील प्रचारसभेत बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, आज जिथपर्यंत नजर जाईल तिथपर्यंत नागरिकांची गर्दी बघायला मिळत आहे. गिरीश महाजन यांनी तीन ते चार दिवस खूप काम केले. धुळे जिल्ह्यात महिला उमेदवारांची संख्या जास्त आहे. जी-जी आश्वासने मी दिली होती तीन पूर्ण करण्याचे काम केले.

पुढे बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. सुरुवातीला कमालच झाली. सुरुवातीला तुम्ही चौकार मारला आहे. आपले लोक बिनविरोध निवडून आले तर काही लोकांना मिरची लागते. तुमको को मिरची लगी तो मे क्या करू? संसदेत खासदार बिनविरोध आलेतर लोकशाही जिवंत अन् धुळ्याच्या जनतेने चार नगसेवक बिनविरोध दिले तर लोकशाहीचा खून झाला असे म्हणणाऱ्यांचे डोके कुठे आहे ते सांगायला नको.

### आरक्षणाचा लाभ ...

कर्नाटक उच्च न्यायालयाचा निर्णय रद्द : जस्टिस जेके माहेश्वरी आणि जस्टिस विजय बिश्नोई यांच्या खंडपीठानं केंद्र सरकारची याचिका स्वीकारत कर्नाटक उच्च न्यायालयाचा निर्णय रद्द केला. कर्नाटक उच्च न्यायालयानं अनुसूचित जातीच्या एका उमेदवाराला ओपन श्रेणीमधून नियुक्ती देण्यास परवानगी दिली होती. त्या उमेदवाराला अंतिम परीक्षेत मेरिट लिस्टमध्ये ओपन उमेदवारापेक्षा चांगले गुण मिळाले होते.

काय प्रकरण होते?

आरक्षणाचा लाभ घेतलेला उमेदवार जी. किरण यांची अंतिम रँक लिस्टमध्ये १९ व एटनी यांची ३७ वी रँक होती. क्वॅडर देताना कर्नाटकमध्ये एक ओपन इनसाईडर जागा होती. तिथे कोणतीही एससी इनसाईडर व्हेकन्सी नव्हती. मात्र किरण यांनी चांगल्या रँकमुळे ओपन श्रेणीतील जागेवर दावा केला होता.

पूर्व परीक्षांमध्ये आरक्षणाचा लाभ

न्यायालयाने वन सेवेच्या आरक्षित नसल्या क्वॅडरमध्ये एका अनुसूचित जाती उमेदवाराला नियुक्ती देण्याच्या मागणीवर विचार करण्यास नकार दिला. अर्ज करणाऱ्या उमेदवाराने प्राथमिक परीक्षांमध्ये आरक्षणाचा लाभ घेतला होता.

### ११ वर्षांच्या भावाने...

क्षणाचाही विलंब न करता शिवमने प्रसंगावधान राखत बहिणीचा पाय पकडला आणि तिला बिबट्याच्या जबड्यातून ओढून काढण्याचा प्रयत्न सुरू केला. बिबट्याने दोघाना काही अंतर फरफटत नेले, मात्र शिवमने बहिणीचा पाय सोडला नाही. याच दरम्यान मुलांच्या आईने जोरात आरडाओरडा केला. आवाज आणि लोकांची गर्दी वाढताच बिबट्याने अखेर मुलीला सोडून पळ काढला.

स्वेटर आणि टोपी ठरली संरक्षणाची ढाल

स्वरांजलीने स्वेटर व डोक्यावर टोपी घातलेली असल्याने बिबट्याचे दात थेट मानेत रुतले नाहीत. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली. मात्र तिच्या मान, हात आणि पाठीवर जखमा झाल्या आहेत. दोन्ही मुलांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती आहे.

अवघ्या ११ वर्षांच्या शिवम पाटीलने दाखवलेल्या धैर्यामुळे मोठा अनर्थ टळला. जीव धोक्यात घालून बहिणीला वाचवणाऱ्या या चिमुकल्या वीराचे गावासह संपूर्ण जिल्ह्यातून कौतुक होत आहे.

### बुलढाण्यात लाडकी...

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. लवकरच या प्रकरणात पुढील कारवाई केली जाणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

शासनाची फसवणूक करून 'लाडकी बहीण' योजनेचा लाभ घेणे संबंधित कर्मचाऱ्यांना चांगलेच भोवल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे. महिला व बालकल्याण विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रमोद येंडोले यांनी या संपूर्ण कारवाईची अधिकृत माहिती दिली आहे.

### शिर्डीला साई...

जागीच मृत्यू झाला आणि दोन गंभीर जखमी झाले.

विशेष म्हणजे या अपघातात मृतकांमध्ये दीपक जगन डावखर (वय २२), आकाश मनोहर डावखर (वय २२), दीपक विजय जाधव (वय २२) यांचा समावेश आहे. जखमींमध्ये रुपेश गणेश भगत (वय १९) आणि रोशन गंगाधर डावखर यांचा समावेश आहे.

प्रशासनाने अपघाताच्या कारणाची चौकशी सुरू केली असून, महामार्गावर वाहनांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी अधिक सतर्कता घेण्याचे आवाहन केले आहे.

### पुणेकरांचा...

घाटाचा वापर करावा असे आवाहन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून केले आहे.

बोपदेव घाटामध्ये दुरुस्तीचे काम सुरु राहणार असलयाने या कालावधीत एकेरी वाहतूकही सुरु राहणार नसल्याने वाहनचालकांनी या घाटाच्या दिशेने जाऊच नये. त्याऐवजी नेमून दिलेल्या पर्यायी मार्गाचा वापर करावा. दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यासाठी आणि हे काम वेळेत पूर्ण व्हावे यासाठी प्रवाशांनी सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

### काँग्रेस वंचित...

आरोग्याची हमी, आपत्कालीन उपचार व आरोग्यसेवांचा विस्तार.

* भ्रष्टाचारमुक्त व टक्केवारीमुक्त महानगरपालिका : ई-गव्हर्नन्सद्वारे सेवा जलद, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख करणे. * घर तिथे रस्ता, नाली, नळ, पथदिवा व कचरापेटी : मूलभूत नागरी सुविधांची हमी देत प्रत्येक प्रभागाचा समतोल विकास. * महिलांसाठी मोफत सिटी बस प्रवास : शिक्षण, नोकरी व आरोग्यासाठी

महिलांना सुरक्षित आणि सुलभ प्रवास. * स्मार्ट शहर व आधुनिक वाहतूक व्यवस्था : स्मार्ट सिग्नल, नियोजनबद्ध

वाहतूक आणि अपघातमुक्त रस्ते. या पंचसूत्री जाहीरनाम्यात एकूण १२ पाने आहेत. ज्यामध्ये इतर शहराच्या विकासकामांचा आराखडा मांडण्यात आला आहे. या मध्ये ३०० शुद्ध पिण्याच्या पाण्याचे आरओ प्लांट उभारणे, महिलांसाठी उद्यमित मॉल, जिजाऊ पथक, ५ वर्षात १ लाख वृक्षारोपण करण्याची हमी, कचरामुक्त लातूर करण्यासाठी विविध उपयोजना, प्रत्येक प्रभागात हेल्थ क्लिनिक आणि कौशल्य विद्यापीठांशी करार करत रोजगाराभिमुख प्रशिक्षण देण्याचे आश्वासन करण्यात आले आहे. या सोबतच

महापालिका मिड डे मिल योजना अंतर्गत १५ रूपात पोट भर जेवण देण्यात येणार आहे. या जाहीरनाम्य मध्ये सर्व धर्म समाभावचा संदेश देखील दिसून आला. ज्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ७० फुटी पुतळा आणि प्रेरणा सृष्टी साकारणे, बहुजन सांस्कृतिक केंद्राची निर्मिती, कै. शिवाजी पाटील

निलंगेकर साहेब व कै. शिवराज पाटील चाकूरकर साहेबांच्या स्मृतिस्थळाची उभारणी, पुतळे, चौक नामकरण व सुशोभिकरणाचे काम आणि शिवाजी महाराजांची भव्य शिवसृष्टी उभारण्यात येईल. तसेच महावीर स्तंभ आणि अल्पसंख्यांक

कल्याण केंद्र व भटके-विमुक्त कल्याण केंद्राची स्थापना करण्यात येईल. यावेळी बोलताना उपस्थित नेत्यांनी सांगितले की, काँग्रेस फक्त आश्वासने देत नाही तर दिलेली वचने पूर्ण करण्याची जबाबदारी स्वीकारते. लातूरच्या

विकासासाठी सामाजिक न्याय, समावेशकता आणि पारदर्शक प्रशासन हेच काँग्रेसवंचित बहुजन आघाडीचे प्रमुख सूत्र राहील. लातूरच्या विकासासाठी आम्ही शब्द देतो, वचन देतो आणि ते पूर्ण करतो, या विश्वासासह हा जाहीरनामा लातूरकरांना समर्पित करण्यात आला.

### काँग्रेस सत्तेत...

### आमदार अभिमन्यू...

विकासाच्या केंद्रस्थानी ठेवून शेतरस्ते, पाणी आणि वीज या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात आहे. या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्याचा आमचा संकल्प आहे.

या कार्यक्रमास संतोष अप्पा मुक्ता, सुभाष जाधव, हनुमंत किनीकर, ड. परीक्षित पवार, प्रवीण किनीकर, रेखनाथ देवणीकर, राधाकृष्ण जाधव, आदिनाथ जाधव, प्रतीक पाटील, प्रशांत डोके, राखी निकम,राम बिराजदार, सतीश मझेर, बंकर पाटील, एकनाथ शिंदे, सचिन अनसरवाडे, शंभूराज भोसले, महादेव जाधव, बंटी पाटील. स्थानिक ग्रामस्थ, पदाधिकारी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. किनीनवरे गावात झालेल्या या विकासकामांमुळे परिसराच्या सर्वांगीण प्रगतीला नवी दिशा मिळणार असल्याची भावना यावेळी ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# तेलसाठ्यासाठीच अमेरिकेची दंडेलशाही

इंधन तेलाने समृद्ध असलेल्या व्हेनेझुएला या देशावर अमेरिकेने हल्ला करून त्या देशाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो व त्यांच्या पत्नी सिलिया फ्लोरेस यांना जेरबंद करून अमेरिकेच्या तुरुंगात डांबले. अमेरिका व्हेनेझुएलावर हल्ला करणार याची कुणकुण जगाला काही महिन्यापूर्वीच लागली होती. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे व्हेनेझुएलावर सातत्याने टीका करत होते. व्हेनेझुएलावर हल्ला केल्यानंतर ट्रम्प यांनी या हल्ल्यामागचे कारण सांगताना सांगितले की अमेरिकेत जी बेकायदेशीर ड्रग्स विक्री होत आहे त्याला व्हेनेझुएला जबाबदार आहे. व्हेनेझुएला या देशातूनच अमेरिकेत बेकायदेशीर ड्रग्सचा पुरवठा होतो तो रोखण्यासाठी आम्ही हा हल्ला केला मात्र डोनाल्ड ट्रम्प यांचा हा दावा किती तकलादू आहे हे जगाला माहीत आहे. अमेरिकेने व्हेनेझुएलावर का हल्ला केला हे संपूर्ण जग जाणून आहे. या हल्ल्यामागचे खरे कारण हे व्हेनेझुएलातील तेल हे आहे. व्हेनेझुएला हा जगातील चौथ्या क्रमांकाचा तेल उत्पादक देश आहे. अमेरिकेला व्हेनेझुएला मधील हे तेलसाठे हवे आहेत. हे तेलसाठे मिळवण्यासाठीच अमेरिकेने व्हेनेझुएलावर हल्ला केला. अमेरिका स्वतःच्या स्वार्थासाठी आणि फायद्यासाठी कोणत्या थराला जाऊ शकते हे ट्रम्प यांनी या हल्ल्यातून दाखवून दिले आहे. ट्रम्प यांची ही दंडेलशाही निषेधार्हच आहे संपूर्ण जगाने याचा निषेध करायला हवा. अमेरिकेने केलेले हे कृत्य संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदीमध्ये नमूद केलेल्या तत्त्वांचे उल्लंघन आहे. अर्थात अमेरिकेने तेलासाठी किंवा स्वतःच्या फायद्यासाठी एखाद्या देशाची राखरांगोळी केल्याची ही पहिली वेळ नाही. स्वतःला जगाचे फौजदार समजून कोणत्याही देशावर हल्ला करायचा आणि तो देश नेस्तनाबूत करून तेथील तेलसाठे व खनिजे हस्तगत करायचे हे अमेरिकेचे धोरणच आहे. याआधीही त्यांनी असा प्रकार अनेकदा केला आहे. लिबिया या देशावर २०११ साली असाच हवाई हल्ला करून तेथील सत्ताधीश असलेल्या गद्दाफी यांची ४२ वर्षाची सत्ता संपुष्टात आणली होती. लिबिया हा आफ्रिकेतील सर्वात मोठा तेलसाठा असलेला देश होता. अमेरिकेला तो तेलसाठा हवा होता जोवर गद्दाफी सत्तेवर असतील तोवर त्यांना हा तेलसाठा मिळणार नव्हता म्हणून अमेरिकेने त्यांना हटवले त्यासाठी त्यांनी थेट त्या देशावर हवाई हल्ला केला. इराक हा असाच तेल साठ्याने समृद्ध असलेला देश. या इराकमध्ये सद्दाम हुसेन यांची हुकूमशाही होती. सद्दाम हुसेन आपल्याला तेल देणार नाही हे अमेरिका जाणून होती म्हणून मग इराकने घातक शस्त्रसाठा जमवला असून या शस्त्रांनी सपूर्ण जगाला धोका निर्माण झाला आहे अशी आवई अमेरिकेने उठवली आणि इराकने जमवलेली शस्त्रास्त्रे हस्तगत करायची आहेत असे सांगून इराकवर हल्ला केला आणि सद्दाम हुसेन यांना फासावर लटकवले मात्र ज्या घातक शस्त्रांचे कारण सांगून अमेरिकेने इराकवर हल्ला केला ती घातक शस्त्रे अमेरिकेला मिळालीच नाही. मिळणार तरी कशी? कारण तशी घातक शस्त्रे इराकमध्ये नव्हतीच. अमेरिकेला मिळाले ते इराकमधील तेलसाठे. अमेरिकेने इराकमधील तेलसाठ्यासाठी सपूर्ण इराक बेचिराख करून टाकले होते. १९८९ साली पनामा या छोट्या देशावर देखील अमेरिकेने अमली पदार्थांचा व्यापार चालू असल्याचा आरोप करून हल्ला केला होता. या हल्ल्यात ही त्या देशाचे तत्कालीन राष्ट्रप्रमुख मॅन्युअल नोरियोगा यांना अटक करून ४० वर्षाची शिक्षा सुनावली होती. या हल्ल्यामागचे मुख्य कारण हे होते की पनामा कालवा हा जागतिक व्यापारासाठी महत्वाचा होता. या कालव्यावर अमेरिकेला स्वतःचे नियंत्रण मिळवायचे होते. नोरियोगांना सत्तेवरून हटवल्या शिवाय अमेरिकेला पनामा कालव्यावर नियंत्रण मिळवणे अशक्य होते त्यासाठीच त्यांनी अवैध अमली पदार्थांची तस्करी केल्याचा आरोप ठेवून या देशावर हल्ला केला आणि पनामा कालव्यावर स्वतःचे नियंत्रण मिळवले. व्हिएतनाम या देशावर देखील तेलसाठ्यासाठीच अमेरिकेने अनेकदा हल्ले केले. आताही अमेरिकेने त्याच कारणासाठी व्हेनेझुएलावर हल्ला केला. आता ते व्हेनेझुएलात स्वतःच्या मर्जीतील व्यक्तीला सत्तेवर बसवतील आणि त्याच्या माध्यमातून व्हेनेझुएलातील तेलसाठ्यावर नियंत्रण मिळवतील. अमेरिकेच्या व्हेनेझुएला वरील हल्ल्याने जगात भयंकर संदेश गेला आहे. आपल्याला मान्य नसलेल्या दुसऱ्या देशाच्या नेत्यांविरोधात अशी कारवाई करता येऊ शकते हे अमेरिकेने जगाला पुन्हा एकदा दाखवून दिले आहे. भविष्यातही याची पुनरावृत्ती होऊ शकते म्हणूनच अमेरिकेच्या या दंडेलशाही विरुद्ध जगाने एकत्र यायला हवे. अमेरिकेच्या या दंडेलशाहीविरुद्ध आता संपूर्ण जगाने आवाज उठवायला हवा.

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

Printed by, Owned by, Published by & Edited by GANGADHAR ABHANG DIGOLE , Printed by GHONE NARASHINHA PANDURANG, Printed at Magic Publication, Shop No.10, MANAPA SHOPING COMPLEX, GANDHI CHOWK, LATUR, Tq.& Dist. LATUR - 413512 & Published at H.No.255, Shri SAI SCHOOL NEAR, Sona Nagar, Barshi Road, LATUR, DIST- LATUR-413512 Tq.& Dist. PARBHANI - 431401 MAH. Editor : GANGADHAR ABHANG DIGOLE RNINO.MHMAR/25/A1409

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक- गंगाधर अभंग डिगोळे यांचे करीता घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १० मनपा शॉपिग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय घर नं. २५५, श्री साई स्कूल निअर सोना नगर, बार्शी रोड, लातूर, ता. जि. लातूर . - ४१३५१२, येथे प्रकाशित केले. संपादकः गंगाधर अभंग डिगोळे मो.९४०५२९५२०, ९०२८८४५२३३ RNINO.MHMAR/25/A1409

# प्रभाग ६ मधील नागरिकांच्या हृदयात कमळ - गौरव काथवटे



**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर/ प्रतिनिधी:प्रभाग क्रमांक ६ हा लातूर शहराचे हृदय म्हणून ओळखला जातो आणि या प्रभागातील प्रत्येक नागरिक व मतदाराच्या हृदयात कमळ आहे.

त्यामुळे भाजपाच्या चारही उमेदवारांचा विजय निश्चित आहे, असे प्रतिपादन गौरव काथवटे यांनी केले. गौरव काथवटे हे भाजपाचे प्रभाग क्रमांक ६ मधील उमेदवार आहेत. त्यांच्यासह गणेश गवारे, सौ.ज्योती आवसकर व मीना गायकवाड हे उमेदवार आहेत.चारही उमेदवार झोकून देऊन प्रचाराच्या कामाला लागले आहेत. सकाळच्या वेळी प्रभागात प्रचारफेरी काढून नागरिकांशी संवाद साधला जात आहे.भाजपाच्या वतीने लातूरच्या विकासासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या मदतीने राबविल्या जात असलेल्या योजनांची माहिती नागरिकांना दिली जात आहे.

सायंकाळच्या वेळी प्रभागात कॉर्नर बैठका घेतल्या जात आहेत. या बैठकामध्ये मनोगत व्यक्त करताना गौरव काथवटे बोलत होते. त्यांनी सांगितले की, विकासाची हमी हा भाजपचा शब्द आहे.२०१४ पासून केंद्रात नरेंद्र मोदी आणि राज्यात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात गतीने विकासकामे केली जात आहेत. विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी लातूर शहर आणि शहराला विकसित करण्यासाठी आपल्या प्रभागाचाही विकास होणे आवश्यक आहे. त्यामुळे लातूर महानगरपालिकेत आणि प्रभागातही भाजपाचे उमेदवार विजयी होण्याची गरज आहे. प्रभागातील नागरिकांनी १५ जानेवारी रोजी मतदान करताना भाजपाच्या कमळ या निशाणी समोरील बटन दाबून सर्व उमेदवारांना मताधिक्याने विजयी करावे, असे आवाहनही गौरव काथवटे यांनी केले. गणेश गवारे,सौ ज्योती आवसकर व मीना गायकवाड यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले. या बैठकांना प्रभागातील नागरिक, भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मतदारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# सेवा निवृत्त अधिकाऱ्यांच्या पुढाकारातून 'शिवनेरी सिनिअर व्हॉलीबॉल क्लब'ची स्थापना



**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर (प्रतिनिधी)- तेरणा शासकीय वसाहत येथील जलसंपदा विभागाच्या मैदानाचे नूतनीकरण करून सेवानिवृत्त उपअभियंता नितीन बी. पाटील व योगीराज माने यांच्या पुढाकारातून शिवनेरी सिनिअर, व्हॉलीबॉल क्लबची स्थापना करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे ज्येष्ठ नागरिकांमध्ये क्रीडासंस्कृती, शिस्त व आरोग्याबाबत नवा आदर्श निर्माण होत आहे.

या क्लबच्या माध्यमातून कृषी विभागाचे सुरेश कोकाटे, वाय. डी. भोसले, नानासाहेब पाटील, रोहिले नाना, अंकुशे सर यांच्यासह अनेक सेवा निवृत्त व कार्यरत अधिकारी एकत्र येत दररोज सकाळी ८ ते १० : ०० वाजण्याच्या वेळेत उत्साहात व खेळाडूवृत्तीने व्हॉलीबॉल खेळत आहेत. या खेळामुळे शासकीय वसाहतीतील वातावरण खेळीमेळीचे झाले असून, जलसंपदा विभागातील तरुण कर्मचारीही नियमित सरावासाठी मैदानावर येत आहेत.

मैदानाच्या परिसरात वृक्षलागवड व संवर्धनाचे कामही खेळाडूंकडून केले जात असून, क्रीडासोबत पर्यावरण जपण्याचा संदेश समाजात दिला जात आहे. या क्लबमध्ये सहभागी असलेले बहुतांश खेळाडू ६० वर्षांवरील असूनही त्यांचा खेळाप्रती असलेला उत्साह पाहता निरोगी राहण्याचा मंत्र समाजात रुजावा हाच या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. तसेच नवोदित खेळाडूंना एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा हेतूही यातून साध्य होत आहे. सर्व खेळाडू शिवनेरी भगव्या रंगाच्या एकसारख्या पोशाखात शिस्तबद्धपणे सहभागी होत असून, छत्रपती शिवाजी महाराजांनी मावळ्यांना दिलेल्या एकतेच्या व समाजोपयोगी कार्याच्या शिकवणीनुसार हे सर्व सदस्य एकत्र येत प्रेरणादायी कार्य करत आहेत. या उपक्रमासाठी ज्येष्ठ खेळाडू योगेश अडाणे व कातळेमामा यांचे मार्गदर्शन लाभत असून, भिसे, उतके, झाडे, उत्तमराव फाटक, जाधव , दीपक बिराजदार यांच्यासह कृषी व जलसंपदा विभागातील अनेक अधिकाऱ्यांचे मोलाचे योगदान लाभले आहे.सुरुवातीला अवघ्या १० सदस्यांपासून सुरू झालेला हा उपक्रम आज ५० सदस्यांपर्यंत पोहोचला असून, भविष्यात ही संख्या शंभरीपर्यंत जाईल, असा विश्वास अभि. नितीन पाटील यांनी व्यक्त केला आहे. या वयोवृद्ध शिवनेरी संघावर समाजातील सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# भाजपाला साथ द्या, तुमची स्वप्न पूर्ण करू

## प्रभाग २ मधील मेळाव्यात ना. मेघनाताई बोर्डीकर यांचे आवाहन

**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर/प्रतिनिधी : सर्वसामान्य जनतेचा विकास हेच भाजपाचे ध्येय आहे. सामान्य नागरिकांना मुलभूत सुविधांची आणि शासकीय योजनांचे लाभ मिळणे अपेक्षित असते. विकासासाठी सोयी सुविधा गरजेच्या असतात यासाठी आगामी महानगरपालिका निवडणुकीत भाजपाला साथ द्या, तुमची सर्व स्वप्न पूर्ण करू, असे आश्वासन राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री मेघनाताई बोर्डीकर यांनी दिले. लातूर शहर महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक २ मधील भाजपाचे उमेदवार निर्मला कांबळे, रवि सुडे, अमर पटेल आणि पुष्पा भडीकर यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ना. बोर्डीकर बोलत होत्या.




व्यासपीठावर पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, माजीमंत्री तथा निवडणूक प्रमुख आ. संभाजी पाटील निलंगेकर, आ. अभिमन्यू पवार, कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, डॉ. सौ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, माजी आ. गोविंद केंद्रे, शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, रामचंद्र तिरुके यांच्यासह उमेदवारांची व्यासपीठावर उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना ना. मेघनाताई बोर्डीकर म्हणाल्या की, काँग्रेसने आत्तापर्यंत मुस्लिम समाजाचा फक्त वापर केला आणि विकासापासून वंचित ठेवले. ही बाब आता सर्वांनाच कळली आहे. यामुळे देशातून काँग्रेस हद्दपार होत आहे. मुस्लिम समाज मेहनती असून युवकांना स्वत:च्या पायावर उभे रहायचे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात देश आणि राज्यात सामान्य जनतेच्या हिताच्या योजना राबविल्या जात आहेत. महिलांसाठी लखपती दीदी योजना, कामगारांसाठी विविध योजना सुरु करण्यात आल्या आहेत. विरोधक मुस्लिम समाजाला भाजपाची भीती दाखवतात. पण सरकारने योजनांचा लाभ देताना कधीही दुजाभाव केला नाही, असे त्या म्हणाल्या. केंद्र आणि राज्याप्रमाणे लातूर महानगरपालिकेत भाजपाची सत्ता आली तर विविध योजनांचा लाभ सामान्य जनतेला मिळू शकतो. त्यामुळे आपले मत वाया न घालवता कमळासमोरील बटन दाबा, असे आवाहनही मेघनाताई बोर्डीकर यांनी केले. यावेळी मार्गदर्शन करताना पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले म्हणाले की, पराभव समोर दिसत असल्याने काँग्रेसकडून भावनेचे राजकारण केले जात आहे. परंतु नागरिकांनी भावनेवर नव्हे तर विकासाला मत द्यावे. जो आपला विकास करतो त्याला मत द्या. काँग्रेसने आजपर्यंत मलिदा लाटण्याचे काम केले. परंतु, आता विकासासाठी भाजपाशिवाय पर्याय नाही, असे ते म्हणाले. आ. संभाजी पाटील निलंगेकर म्हणाले की, आजपर्यंत शहराच्या विकासासाठी काँग्रेसने काहीही केले नाही. त्यामुळेच शहरात अस्वच्छता कायम राहिली. सामान्य नागरिकांना गटारीची दुर्गंधी सहन करावी लागली. त्यामुळे मतदानाला जाताना शांतपणे विचार करा. आपले व आपल्या मुलांचे भविष्य कोणाच्या हाती सुरक्षित राहील याचा विचार करा. केवळ भाजपाच्याच हाती आपले भवितव्य सुरक्षित राहील, असेही आ. निलंगेकर म्हणाले. प्रारंभी पाशा पटेल यांनीही उपस्थितांना संबोधीत केले. प्रभाग क्रमांक २ आणि शहराच्या विकासासाठी भाजपाला निवडून देणे आवश्यकआहे. मुस्लिम समाजातही आता बदल होत आहे. आजवर काँग्रेसने आपला वापर केल्याचे समाजाच्या लक्षात आले असल्याचे पाशा पटेल यांनी नमूद केले. या सभेस प्रभाग क्रमांक दोन मधील नागरीक, भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सागरी समुद्रवीर जलतरण स्पर्धेत नेत्रदीपक यश

**दै. अदिती एक्सप्रेस**

नांदेड- श्रीराम सी स्विमिंग असोसिएशन आयोजित पोरबंदर गुजरात येथे नुकत्याच पार पडलेल्या समुद्रवीर सागरी जलतरण स्पर्धेत आपल्या कै. शांताराम सगणे जलतरणिकेच्या जलतरणपटूंनी उल्लेखनीय यश संपादन करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. प्रतिकूल समुद्री लाटा आणि लांब पल्ल्याचे अंतर असूनही स्पर्धकांनी जिद्द, चिकाटी आणि उत्कृष्ट तांत्रिक कौशल्याच्या जोरावर ही कामगिरी बजावली. या स्पर्धेत अनेक राज्यातील जलतरणपटूंनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये आपल्या नांदेडच्या खेळाडूंनी आपले वर्चस्व सिद्ध केले. विशेष म्हणजे, सुमारे १५ किलोमीटर अंतराची ही सागरी शर्यत ठराविक वेळेत पूर्ण करताना खेळाडूंनी सुरक्षितता, श्वसन नियंत्रण आणि लाटांशी जुळवून घेण्याची कला प्रभावीपणे दाखवून दिली.

या स्पर्धेत ऋषिकेश उमाकांत बेंबडे १५ किलोमीटर (शिवशक्ती माध्यमिक विद्यालय काकांडी), उत्कर्ष गणेश कदम १० किलोमीटर (पीपल्स हायस्कूल गोकुळ नगर नांदेड), आनंद व्यंकट चिंचोरे पाच किलोमीटर, (पीपल्स हायस्कूल नांदेड) अभिनव नारायण गायकवाड पाच किलोमीटर , सानिध्यात बळीराम अकोले पाच किलोमीटर अंतर पोहून यशस्वी कामगिरी केली. या यशासाठी कै. शांताराम सगणे जलतरनिकेचे मुख्य प्रशिक्षक कोच श्री राजेश सोनकांबळे सर (एन आय एस ), श्री संघर्ष सोनकांबळे सर (एन आय एस कोच) श्री मयूर केंद्रे सर यांचे सातत्यपूर्ण मोलाचे मार्गदर्शन लाभले. प्रशिक्षकांच्या अचूक आणि तंत्रशुद्ध मार्गदर्शनामुळेच विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केल्याचे सर्वत्र बोलले जात आहे. स्थानिक क्रीडा प्रेमींनी विजेत्यांचे अभिनंदन करत पुढील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. ही कामगिरी तरुण पिढीसाठी प्रेरणादायी ठरणारी असून सागरी जलतरण क्रीडेला नवसंजीवनी देणारी आहे. भविष्यात आणखी मोठ्या स्पर्धांमध्ये असेच यश मिळावे, अशी अपेक्षा सर्वांनी व्यक्त केली आहे.

# भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या वक्तव्याचा लातूर तालुका काँग्रेसकडून निषेध

**दै. अदिती एक्सप्रेस**

मुरूड अकोला (ता. लातूर) -भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी लातूर येथे भाजप कार्यकर्त्यांच्या बैठकीत बोलताना दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या आठवणी पुसून टाकू, असे वादग्रस्त वक्तव्य केले.यामुळे महाराष्ट्रातील जनतेच्या भावना तिव्र झाल्या असल्याने लातूर तालुका काँग्रेसच्या वतीने तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले.

मुरूड अकोला येथे काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकत्र येत रविंद्र चव्हाण यांच्या फोटोला जोडे मारून आपल्या भावना तीव्र शब्दांत व्यक्त केल्या. विलासराव देशमुख हे महाराष्ट्राच्या राजकारणातील जनतेच्या मनात कायम घर करून राहिलेले लोकनेते असून त्यांच्या कार्याचा आणि नेतृत्वाचा अपमान सहन केला जाणार नाही, असा इशारा यावेळी देण्यात आला.

काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, विलासराव देशमुख साहेबांनी राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी मोलाचे योगदान दिले असून त्यांचे स्मरण जनतेच्या मनातून कधीही पुसले जाऊ शकत नाही. भाजप नेत्यांनी अशी बेजबाबदार वक्तव्ये करण्याऐवजी जनतेच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. या आंदोलनात लातूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष उमेश बेद्रे, रेणा कारखान्याचे व्हाईस चेअरमन ड.प्रवीण पाटील, गणेश ढगे, तुकाराम पाटील,विलास कारखान्याचे माजी व्हाईस चेअरमन रवींद्र काळे, युवक काँग्रेस माजी अध्यक्ष रघुनाथ शिंदे, अनिल पाटील, अनंत बारबोले, महेंद्र मुळे, श्रीनिवास शेळके, गोविंद बोराडे, सतीश काळे, वीरसेन भोसले, रमेश देशमुख, पवन देशमुख,किसान सेलचे अध्यक्ष रामानंद जाधव, विजय सूर्यवंशी, बाळासाहेब कदम, नारायण पाटील, बालाजी पांढरे,शिवराज बिडवे, अमर पाटील(गोडसे),राजेसाहेब सवई,रवी कांबळे, ऋषिकेश मुटकुळे, शंकर देशमुख, ज्ञानेश्वर लकडे, गणेश सोमासे (पाटील),मनोज कदम, श्रीकांत घुले, तोफिक पठाण, ज्ञानेश्वर देशमुख, प्रवीण कोद्रे, गजानन बुलबुले, ऋषभ चव्हाण, किशोर सूर्यवंशी, विपिन गवारे, गजेंद्र उपाडे , स्वप्निल कोसे, रघुनाथ शिंदे, दिग्विजय शिंदे, बालाजी रोंगे, ऋषीकेश गायकवाड, काकासाहेब हेडे, यशवंत शिंदे, बंडू घोडके यांच्यासह लातूर तालुका काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




भाजप यक्षांनी आपल्या वक्तव्याबद्दल महाराष्ट्रातील जनतेची जाहीर माफी मागावी केवळ देशमुख परिवाराची माफी मागून चालणार नाही. अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही काँग्रेसकडून देण्यात आला.

# डिप्लोमा परिक्षेच्या निकालामध्ये एम एस बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयाची भरारी

**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर : नुकताच महाराष्ट्र राज्य बोर्ड ऑफ टेक्निकल एज्युकेशन यांनी डिप्लोमा हिवाळी परीक्षेचा निकाल जाहीर केला. या निकालामध्ये एम एस बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात मागील वर्षापासून सुरू झालेल्या डिप्लोमा शाखेने उत्कृष्ट निकालाची परंपरा राखली आहे.

द्वितीय वर्ष सिविल अभियांत्रिकी मधून कु.ज्योती मंत्री हिने ८७.१८ इतके गुण तर प्रथम वर्षामध्ये कु. पायल श्रेया राजू हिने ८५% इतके गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला.

द्वितीय वर्ष संगणक अभियांत्रिकी मध्ये सुनील पाटील याने ८८% इतके गुण मिळवले तसेच प्रथम वर्षात कु. संध्या कांबळे हिने ८७.५० इतके गुण मिळवून प्रथम क्रमांक राखला.

विद्युत अभियांत्रिकी मध्ये कु. अदिबा कासार हिने द्वितीय वर्षात ८८.१२ इतके गुण मिळवले तर प्रथम वर्ष विद्युत अभियांत्रिकी मध्ये वेदांत मुळे याने ८२.१२% इतके गुण मिळवत प्रथम क्रमांक प्राप्त केला. इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागाच्या द्वितीय वर्षांमध्ये कु.ऋतुजा मार्कड हिने ७८.११% इतके गुण मिळवून प्रथम क्रमांक तर प्रथम वर्षामध्ये कु. सायली कवठे हिने ८६ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला.

माहिती तंत्रज्ञान विभागामध्ये द्वितीय वर्षामध्ये रियाज गस्ते याने ८३.१८% गुण मिळवून प्रथम क्रमांक तर प्रथम वर्षामध्ये प्रसाद सिंग ठाकूर याने ८७.३०% इतके गुण मिळवत प्रथम क्रमांकाचा मान मिळवला. मेकॅनिकल विभाग द्वितीय वर्षामध्ये कु.शाहूबाई जाधव हिने ८०.५६ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला तर प्रथम वर्षामध्ये कु. प्राची पंडिकोंडे हिने ७५ टक्के इतके गुण मिळवत प्रथम क्रमांकावर बाजी मारली. तसेच संपूर्ण महाविद्यालयाचा निकाल हा ८२.२५ टक्के लागला. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष श्री माधवराव पाटील चिंचोलीकर, सचिव श्री माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव श्री सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष श्री विजय रेवडकर, कार्यकारी संचालक श्री प्रदीप दिंडेगावे, संचालक श्री राजेश्वर बुके, श्री बस्वराज एरटे, श्री काशिनाथ साखरे, सौ. ललिताताई पांढरे, श्री महेश हलगे, श्री बाबुराव तरगुडे, श्री गुरुलिंग धाराशिवे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे मनः पूर्वक अभिनंदन केले आहे. याप्रसंगी महाविद्यालयाचे परिसर संचालक डॉ मोहन बुके, प्राचार्य डॉ एस एम जगदे, उपप्राचार्य प्रा विरभद्र बाळे, निबंधक डॉ सौ ज्योती पाटील, डिप्लोमा प्रमुख डॉ सुरज दामरे, प्रथम वर्ष प्रभारी प्रा. एन.के. प्रयाग यांनी सर्व विद्यार्थ्यांचे व संबंधित प्राध्यापकांचे कौतुक व अभिनंदन केले आहे.

# लातूर ग्रामीणमधील चारशे आशा स्वयंसेविकांना आ. कराड यांनी दाखवला आशा चित्रपट

**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर – ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या आशा स्वयंसेविकांच्या कार्यावर प्रकाश टाकणारा त्यांची कहाणी मांडणारा राज्य शासनाचा सर्वोत्कृष्ट पुरस्कार प्राप्त आशा हा सिनेमा आ. रमेशआप्पा कराड यांच्या वतीने लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील चारशे आशा स्वयंसेविकांना मंगळवारी दाखवण्यात आला. यावेळी युवा नेते ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड हे आवर्जून उपस्थित होते. सिनेमागृहातून चित्रपट पाहून बाहेर आल्यानंतर ऊर्जा मिळाल्याचे प्रत्येक आशा स्वयंसिकांच्या चेहऱ्यावर दिसून येत होते.

ग्रामीण भागातील महिलांना मुख्य प्रवाहात आणण्यामध्ये आशा स्वयंसेविकांचे मोठे योगदान असून त्यांचे कार्यावर प्रकाशझोत टाकणारा आणि ग्रामीण भागाचे वास्तव सांगणारा आशा हा सिनेमा नुकताच प्रदर्शित झाला या सिनेमात



अभिनेत्री रिंकू राजगुरू यांनी आशा स्वयंसेविकेच्या भूमिकेला न्याय दिला असून पगारीसाठी नव्हे तर स्वतःच्या समाधानासाठी काम करणाऱ्या (मालती) आशा हिच्या चेहऱ्यावर संयम, डोळ्यात तगमग आणि आतून असणारी जिद्द दिसून आली. चालत रहा पुढे हे गीत प्रेक्षकांना ऊर्जा देऊन जाते. चित्रपट सुरू होण्याअगोदर उपस्थित आशा स्वयंसेविका यांच्याशी संवाद साधताना युवा नेते ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, आशा स्वयंसेविकांचे समाजातल्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणारे मोठे कार्य आहे या कार्याची आ. रमेशआप्पा कराड यांनी वेळोवेळी दखल घेतली असून प्रेरणा मिळावी यासाठीच आशा चित्रपट दाखविण्याचा सुयोग त्यांनी घडून आणला आहे असे बोलून दाखवले. याप्रसंगी भाजपाचे वसंत करमूडे, चंद्रकांत कातळे, भाऊसाहेब गुळबिले, ओम चव्हाण, राम भताने, दिलीप पाटील, सुरेखा पुरी, अनुसया फड, शीला आचार्य यांच्यासह स्वयंसेविका जिल्हा समूह संघटक संगीता डावरे, रेखा कौटबे, जयश्री थोरमोटे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती यावेळी तब्बल चारशे आशा स्वयंसेविकांनी चित्रपट पाहण्याचा आनंद घेतला.

# लेक लाडकी योजनेतून २०३ मुलींचे पालकत्व

## स्वीकारणाऱ्या सुवर्णाताई दुरुगकर यांचा सेवापूर्ती सन्मान




**गिरीधर गायकवाड**

देवणी : एकात्मिक महिला व बाल विकास सेवा कार्यालय, देवणी येथे कार्यरत असलेल्या वरिष्ठ पर्यवेक्षिका तथा माजी बालविकास प्रकल्प अधिकारी सौ. सुवर्णाताई दुरुगकर या वयाच्या एकोणतीस वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाल्या. त्यांच्या सेवापूर्ती निमित्त देवणी पंचायत समिती सभागृहात आयोजित कार्यक्रम ात गटविकास अधिकारी सागर वरांडेकर अध्यक्षस्थानी होते.

यावेळी बोलताना गटविकास अधिकारी सागर वरांडेकर म्हणाले, 'लेक लाडकी योजनेच्या माध्यमातून सुवर्णाताई दुरुगकर यांनी २०३ मुलींना प्रत्येकी एक लाख रुपयांचा लाभ मिळवून देत त्यांच्या आयुष्यातील पालकत्वाची जबाबदारी मातृत्वाच्या भूमि केतून स्वीकारली. गरिबीत जन्मलेल्या मुलींच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व वैवाहिक भविष्याला दिशा देणारे हे कार्य निश्चितच प्रेरणादायी आहे.'

ते पुढे म्हणाले की, ङ्गनोकरी म्हणजे बदली, पदोन्नती व सेवानिवृत्तीचे चक्र असते; मात्र सेवाकाळात केलेल्या कार्याची खरी पोचपावती म्हणजे सेवानिवृत्तीनंतर मिळणारा सन्म ान व प्रेम. सुवर्णाताईंनी वरिष्ठ पर्यवेक्षिका ते बालविकास प्रकल्प अधिकारी म्हणून २८-२९ वर्षांच्या सेवाकाळात लोकाभिमुख प्रशासनाचा आदर्श घालून दिला आहे.ङ्घ

आपल्या नावातच 'सोनं' असलेल्या सुवर्णाताईंनी २०३ मुलींचे आयुष्य सोन्यासारखे उजळवले, असे गौरवोद्गारही त्यांनी काढले. त्यांच्या सेवानिवृत्तीनंतरचा काळ सुख, समृद्धी व आरोग्यदायी जावो, तसेच त्यांना उदंड आयुष्य लाभो, अशा शुभेच्छाही त्यांनी दिल्या.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून देवणी पंचायत समि तीचे माजी सभापती शंकरराव रामचंद्रराव पाटील तळेगावकर उपस्थित होते. यावेळी दुरुगकर कुटुंबाचा भव्य सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे आयोजन एकात्मिक बाल विकास सेवा कार्यालयाच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विस्तार अधिकारी राजकुमार अल्लापुरे, कनिष्ठ सहाय्यक संगीता सूर्यवंशी तसेच विभागातील कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. देवणी तालुक्यातील अंगणवाडी कार्यकर्त्या व मदतनीस मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कनिष्ठ प्रशासकीय अधिकारी ओंकार वंजारी यांनी केले तर आभार सौ. सुवर्णाताई दुरुगकर यांनी मानले.

# पालकमंत्र्यांचे चहापान, नाष्टा अन् गप्पा गोष्टी लातूरकरांनी अनुभवले छत्रपती

**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर/प्रतिनिधी : छत्रपतींच्या घराण्याविषयी तमाम महाराष्ट्राला नितांत आदर आहे. छत्रपतींना पहायला, भेटायला आणि बोलायला मिळणे हे तर भाग्यच समजल जात. पण गुरुवारी लातूरकरांना वेगळाच अनुभव आला. साक्षात छत्रपती लातूरच्या बाजारपेठेत सामान्य नागरिकांसोबत बसून चहा-पान करताना आणि नाष्ट करताना दिसले. हे दृश्य पाहून लातूरकर हरपून गेले. छत्रपतींसोबत फोटो काढायला, सेल्फी घ्यायला झुंबड उडाली.

गुरुवारी सकाळी सामान्य लातूरकर आपल्या दिनक्रमात व्यस्त होते. सकाळची वेळ असल्याने सर्व हॉटेलांमध्ये नाष्ट्यासाठी गर्दी पडलेली होती. तेवढ्यात शहरातील नामांकित तुळजाई इडली गृहासमोर गाड्यांचा ताफा थांबला. सहाजिकच गर्दीचे लक्ष तिकडे गेले. या वाहनातून जिल्ह्याचे पालकमंत्री छत्रपती शिवेंद्रसिंह राजे भोसले, माजी मंत्री आ.



संभाजी पाटील निलंगेकर, डॉ. सौ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर आदी मान्यवर उतरले. हे सर्वजण थेट तुळजाई इडलीगृहात दाखल होत असलेले पाहून नागरिकही अचंबित झाले. हॉटेलमध्ये जावून छत्रपतींसह मान्यवरांनी सामान्य नागरिकांसमवेत बसून नाष्टा केला. लातूरकरांच्या हाताची चव छत्रपतींनीही चाखली. सामान्य लातूरकरांशी चर्चाही केली. लातूरकरांच्या अडीअडचणी व समस्या जाणून घेतल्या. छत्रपतींना पाहून सेल्फी घेण्यासाठी युवकांनी मोठी गर्दीही केली. विविध ठिकाणच्या बैठका आटोपून हे मान्यवर दुपारच्या वेळी न्यायालयाच्या पाठीमागील बाजूस खोरी गल्लीत असणाजया साई टी हाऊस येथे दाखल झाले. तेथे त्यांनी चहापान केले. पालकमंत्री ना. भोसले यांना पाहून हॉटेलमध्ये प्रचंड गर्दी जमा झाली. पालकमंत्री ना. भोसले व आ. संभाजी पाटील यांनी प्रत्येकाशी संवाद साधला. या परिसरात चहापानासाठी येणारे वकील तसेच परिसरातील रहिवाशांनी पालकमत्र्यांसोबत छायाचित्रे काढली. नाव आणि पद मोठे असले तरी छत्रपती शिवेंद्रसिंह राजे भोसले, आ. संभाजी पाटील निलंगेकर हे सामान्य नागरिकांमध्ये मिसळून वावरत असल्याचे पाहून लातूरकरांना सुखद धक्का बसला.

# निलंगा नगरपालिकेत स्वीकृत सदस्यपदी हरिभाऊ सगरे, डॉ. गजेंद्र तरंगे यांची वर्णी

**दै. अदिती एक्सप्रेस**

निलंगा प्रतिनिधी:-निलंगा नगरपालिकेच्या रिक्त असलेल्या स्वीकृत सदस्यपदांसाठी अखेर गुरुवारी शिक्कामोर्तब करण्यात आले. भारतीय जनता पक्षाच्या वतीने ज्येष्ठ पत्रकार हरिभाऊ सगरे तर काँग्रेसच्या वतीने प्रा. डॉ. गजेंद्र तरंगे यांची निवड करण्यात आली आहे. राजकारण, समाजकारण आणि शैक्षणिक क्षेत्रातील दोन अभ्यासू चेहऱ्यांना संधी मिळाल्याने शहरातून या निवडीचे स्वागत होत आहे.

निलंगा नगरपालिकेच्या राजकारणात स्वीकृत सदस्य पदासाठी अनेक दिवसांपासून बऱ्याच जणांच्या नावांची चर्चा सुरू होती. भाजपच्या वतीने पत्रकार हरिभाऊ सगरे यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले असून सगरे यांचे शहरात मोठे सामाजिक व राजकीय वलय आहे. एक अभ्यासू, संयमी आणि सुसंस्कृत व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ओळख आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून त्यांनी शहराच्या अनेक प्रश्नांना वाचा फोडली असून,



आता थेट सत्तेच्या माध्यमातून त्यांना शहराच्या विकासात योगदान देण्याची संधी मिळाली आहे.

तर दुसरीकडे, काँग्रेस पक्षाने शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवलेले प्रा. डॉ. गजेंद्र तरंगे यांना संधी दिली आहे. डॉ. तरंगे यांनी शिक्षण क्षेत्रात मोठे काम केले असून त्यांचा जनसंपर्क दांडगा आहे. त्यांच्या निवडीमुळे काँग्रेसने एका सुशिक्षित आणि कार्यक्षम चेहऱ्याला पालिकेत प्रतिनिधित्व दिले असल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये आहे.

एका बाजूला प्रदीर्घ अनुभव असलेले हरिभाऊ सगरे आणि दुसरीकडे शैक्षणिक क्षेत्रातील डॉ. गजेंद्र तरंगे अशा दोन दिग्गजांच्या निवडीमुळे निलंगा नगरपालिकेच्या चर्चेचा स्तर उंचावण्यास मदत होणार आहे. या दोन्ही नवनियुक्त सदस्यांचे सर्वच स्तरातून स्वागत होत आहे.

# उदगीर सायकलिंग क्लब-माती वाचवा आंदोलनासाठी १५०० कि.मी. सायकल राईड (रॅली) पूर्ण

**मनेश पाटील**

उदगीर – उदगीर सायकलिंग क्लबच्या २९ उत्साही सायकलस्वारांनी मृदा संवर्धनाचा संदेश घेऊन उदगीरहून सोमनाथ, व्दारका २ राज्यांतून (महाराष्ट्र आणि गुजरात) जाणारा हा १५०० किलोमीटर अंतराचा प्रवास सायकलवर पूर्ण केले आहेत.

या सायकल प्रवासाची सुरुवात उदगीर येथील दुधिया हनुमान, श्री. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून झाली, प्रवास करताना प्रत्येक शहरात रॅलीच्या माध्यमातून उदगीर ते परळी वैजनाथ, गेवराई, घृष्णेश्वर, शिर्डी, नाशिक, किल्ला पारडी, सुरत(हजिरा) ते घोगा (बोटिंग), राजुळा, सोमनाथ (सोरठी सोमनाथ मंदिर), पोर-बंदर, व्दारका (श्री.व्दारकाधिश मंदिर) असा १५०० कि.मी. किलोमीटर अंतराचा प्रवास ११ दिवसात पूर्ण केलेला आहे.

साईनाथ कोरे, सुनिल ममदापूरे यांच्या नेतृत्वाखाली सायकलस्वार २००२ सालापासून दरवर्षी उदगीर ते तिरुपती हे अंतर सायकलवर पूर्ण करणारी, ही उदगीर म धील विविध क्षेत्रात कार्यरत असणारी मंडळी, या त्यांच्या भक्तीपूर्ण सायकलस्वारीला



दरवेळी सामाजिक आणि पर्यावरण संदेशाची जोड देऊन, समाजाप्रती असलेले त्यांचे उत्तरदायित्व अशा आगळ्या वेगळ्या उपक्रमांतून सातत्यपूर्ण पणे निभावत आहेत.

प्रतिवर्षी प्रमाणे या वर्षी सायकल टीम कॉन्शियस प्लॅनेट डर्रीश डेळश्र (माती वाचवा) उपक्रमासाठी काम करत आहे, जो ईशा फाऊंडेशनचा एक आउटरीच प्रकल्प आहे आणि मृदा संवर्धन आणि पुनरुज्जीवन याविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी काम करत आहे. २०१७ मध्ये रामेश्वरम-' रॅली फॉर रिव्हर्स- नद्यांसाठी रॅली', २०१८ मध्ये महाबलीपुरमब -'ईशा विद्या', आणि २०१९-२० मध्ये कोइंम्बतूर-'कावेरी कॉलिंग' २०२१ मध्ये कन्याकुमारी, २०२२ जगन्नाथ-पुरी, २०२३ श्री. पदमनाभस्वामी (त्रिवेंद्रम), २०२४ श्री. राम मंदिर-अयोध्या 'कॉन्शियस प्लॅनेट' डर्रीश डेळश्र (माती वाचवा) या ईशा फाउंडेशनच्या सोशल आउटरीच प्रकल्पांसाठी त्यांनी असाच सायकलींग द्वारे सहभाग नोंदवून लांबचा पल्ला गाठलेला असून. ईशा फाउंडेशन च्या उपक्रमात सहभागी व्हायचे हे त्यांचे सलग नववे वर्ष आहे.

सायकलींग चा एक वेगळा मापदंड निर्माण करणाऱ्या आणि उदगीरकरांची शान असणाऱ्या या टीम मध्ये साईनाथ कोरे, सुनील ममदापूरे, गोविंद रंगवाळ, बालाजी इंद्राळे, नागनाथ वारद, अतुल वाघम रे, जगदिश पंडित, मुकेश नेरुणे, ज्ञानेश्वर चंडेगावे, महेश आलमकेरे, कपिल वट्टमवार, अश्विन पांढरे, भास्कर कुंडगीर, मुकिंद चव्हाण, आकाश चव्हाण, रामेश्वर तोंडारे, अजित पाटील, सतीशकुमार चवळे, महेंद्र मादलापूरे, प्रेम नाथ मोदी,ओमकार बिरादार, रमाकांत वडजे, प्रमोद बुटले, सुर्यकांत आंबेसंगे, सचिन शेंद्रे, सतिष बिरादार, सचिन पेंडलवार, हरिप्रसाद दंडिमे, रामेश्वर सोनी, अनिरुद्ध जोशी-हुमनाबादकर तसेच सहकारी म्हणून गणेश गुंडरे, कृष्णा म ुंडे, विठ्ठल येनकुरेकर, तातेराव गायकवाड, गोपाळ रोकडे, हे सहभागी होते, सायकलिंग क्लब-माती वाचवा (SAVE SOIL) आंदोलनासाठी १५०० कि.मी. सायकल राईड (रॅली) पूर्ण केल्याबद्दल समाजातील विविध स्तरांतून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होतं आहे.

# दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्यावतीने क्रिकेट सराव शिबिराचे आयोजन



लातूर : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड व दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने पश्चिम विभाग आंतरविद्यापीठ स्पर्धे करिता निवडण्यात आलेल्या मुलींच्या क्रिकेट संघाचे शिबिर दि.०५ जानेवारी ते १० जानेवारी २०२६ या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आलेले आहे.या शिबिरामध्ये विद्यापीठांतर्गत असणाऱ्या विविध महाविद्यालयातील विद्यार्थीनींचा समावेश आहे. त्यात ऐश्वर्या चेवले,संध्या चव्हाण,राधिका शिंदे,मोहिनी खाडप,जानवी वीर, संध्या सुतार,प्रतीक्षा तावसे, ज्ञानेश्वरी हाके,अश्विनी बोरीकर, भाग्यश्री भुसारे,स्वाती कोरडे, गायत्री मुंदडा,वैष्णवी खैरे, ज्योती वाघमारे,साक्षी जाधव, आयुष्का कांबळे यांचा समावेश आहे. सदरील आंतर विद्यापीठ स्पर्धा दिनांक १५ ते २२ जानेवारी २०२६ या कालवधीत बनस्थली विद्यापीठ राजस्थान या ठिकाणी आयोजित करण्यात आली आहे. सदरील संघास प्रा.ऋषिकेश मस्के हे मार्गदर्शन करीत आहेत तसेच शिबिराचे समन्वयक म्हणून प्रा.डॉ.महेश बेंबडे हे कार्य पाहत आहेत.या शिबिरास दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेळ्ळाळे,दयानंद शिक्षण संस्थेच्या क्रीडा समितीचे सदस्य रविंद्रजी व्होरा,डॉ. नितेश स्वामी,प्रा.कल्पना टपेकर आदींनी भेट देऊन संघास पुढील स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या.

# दयानंद वाणिज्य महाविद्यालयात ७ दिवसीय करिअर मार्गदर्शन शिबिराचे उद्घाटन उत्साहात




**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर : दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर आणि कर्मवीर एम.पी.एस.सी. क्लासेस, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ७ दिवसीय करिअर मार्गदर्शन शिबिराचे उद्घाटन उत्साहात पार पडले. या शिबिराचे उद्घाटन एस.टी.आय. लातूर येथील शार्दुल पटेल व अरुण टोकळे यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कॉम्पेटिटिव्ह एक्झाम सेलच्या समन्वयिका डॉ. रूपा गिल्डा यांनी प्रास्ताविक करून शिबिरामागील उद्दिष्टे स्पष्ट केली. प्रमुख मार्गदर्शक म्हणून कर्मवीर एम.पी.एस.सी. क्लासेसचे संचालक रमेश भारती यांनी वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षा, त्यातील करिअर संधी तसेच यशासाठी आवश्यक असलेली अभ्यासपद्धती, सातत्य व नियोजन याविषयी सखोल मार्गदर्शन केले. यावेळी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन पुस्तिकेचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. उद्घाटक अरुण टोकळे यांनी आपल्या मनोगतातून स्वतःचा जीवनप्रवास उलगडत विद्यार्थ्यांनी अडचणींवर मात करून यशाकडे वाटचाल कशी करावी, याबाबत प्रेरणादायी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रशांत मात्रीकर होते. अध्यक्षीय समारोपात त्यांनी विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांचे महत्त्व ओळखून वेळेचे योग्य नियोजन, सातत्यपूर्ण अभ्यास आणि स्पष्ट ध्येय निश्चितीवर भर द्यावा, असे आवाहन केले.

या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, आय. क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. बी. टी. चव्हाण, एम.सी.ए. विभागप्रमुख डॉ. शशिकांत स्वामी, एम.बी.ए. विभागप्रमुख डॉ. वैशाली सातपुते तसेच प्रा. यू. व्ही. दुधभाते यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अजय चव्हाण यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. कल्याणी पाटील यांनी केले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा.दिपाली जिरोबे व प्रा. कृष्णाई पाचंगे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# मतदान केंद्रात ओळख पटविण्यासाठी १२ पुरावे ग्राह्य मनपाची माहिती

**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर /प्रतिनिधी: मनपाच्या आगामी निवडणुकीमध्ये मतदान करताना फोटो असलेले निवडणूक ओळखपत्र नसेल तर केंद्रामध्ये ओळख पटविण्यासाठी १२ पुरावेग्राह्य धरले जाणार असल्याची माहिती राज्य निवडणूक आयोगाच्या वतीने देण्यात आली असल्याची माहिती लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने देण्यात आली.

राज्य निवडणूक आयोगाने या संदर्भात माहिती देणारे पत्र दिले आहे. त्यानुसार मतदान करताना जे १२ पुरावे ग्राह्य धरले जाणार आहेत त्यामध्ये भारताचा पासपोर्ट, आधार ओळखपत्र, वाहन चालविण्याचा परवाना,आयकर विभागाकडील पॅन ओळखपत्र,केंद्र शासन, राज्य शासन, सार्वजनिक उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना फोटोसहित दिलेली ओळखपत्रे,राष्ट्रीयकृत बँका अथवा पोस्ट ऑफिस यामधील खातेदाराचे फोटो असणारे पासबुक, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला फोटोसहीत अपंगत्वाचा दाखला, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेखालील फोटो असलेले ओळखपत्र, निवृत्त कर्मचाऱ्यांचे अथवा त्यांच्या विधवा, अवलंबित व्यक्ती यांची फोटो असलेली निवृत्ती वेतन विषयक कागदपत्रे (उदा:पासबुक, प्रमाणपत्र इ.) लोकसभा, राज्यसभा सचिवालय तसेच विधानसभा, विधान परिषद सचिवालय यांनी आपल्या सदस्यांना दिलेले अधिकृत ओळखपत्र, स्वातंत्र्य सैनिकांचे फोटो असलेले ओळखपत्र व केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालयाने दिलेले आरोग्य विमा योजनेचे फोटोसहीत कार्ड ही कागदपत्रे मतदान करताना ग्राह्य धरली जाणार आहेत.



# सेवाशक्ती संघर्ष एस.टी. कर्मचारी संघाच्या निलंगा आगार

## अध्यक्षपदी नंदकुमार गोस्वामी, सचिवपदी राजू मोरे बिनविरोध

**दै. अदिती एक्सप्रेस**

निलंगा (प्रतिनिधी) : सेवा शक्ती संघर्ष एस.टी. कर्मचारी संघाच्या निलंगा आगार कार्यकारिणीची निवड प्रक्रिया नुकतीच पार पडली. संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष मा. आमदार गोपीचंद पडळकर, केंद्रीय कार्याध्यक्ष माजी मंत्री सदाभाऊ खोत, केंद्रीय सरचिटणीस सतीष मिटकरी व केंद्रीय स.कार्याध्यक्ष संजय पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून निलंगा आगारातील इतर संघटनांमधील अनेक एस.टी. कर्मचाऱ्यांनी यावेळी सेवाशक्ती संघर्ष एस.टी. कर्मचारी संघात जाहीर प्रवेश केला.

या निवड प्रक्रियेत नंदकुमार गोस्वामी यांची निलंगा आगार अध्यक्षपदी, राजू मोरे यांची आगार सचिवपदी तर भरत काळे यांची कार्याध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली.

नवनिर्वाचित कार्यकारिणीच्या निवडीनंतर छोटेखानी कार्यक्रम ात सर्व पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. यावेळी संघटनेचे केंद्रीय उपाध्यक्ष दिलीप घोडके, केंद्रीय सदस्य बालाजी गोणे, नामदेव पाटील, उद्धव कांबळे, विभागीय अध्यक्ष बाळासाहेब नागरगोजे, विभागीय सचिव बालाजी कुंभार आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमास निलंगा आगारातील अनेक चालक, वाहक, यांत्रिक कर्मचारी म ोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये विभागीय कोषाध्यक्ष सय्यद हुसेन, सत्यवान बिराजदार, प्रकाश बिराजदार, सोपान मरे, बालाजी मोरे, बालाजी कोल्हे, दत्ता जाधव, सुकराज जाधव, बाळू मरे, विशाल रेडेकर, दिंगबर मंडले, ज्ञानेश्वर लंगोटे आदींचा सहभाग होता.

नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी संघटनेच्या माध्यमातून एस.टी. कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित म ागण्या, समस्या व हक्कांसाठी संघटितपणे लढा उभारण्याचा निर्धार व्यक्त केला. सेवाशक्ती संघर्ष एस.टी. कर्मचारी संघाच्या माध्यमातून निलंगा आगारातील कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.